**प्रेसनोट** **दिनांक ०५/०३/२०१९**

## स्वारगेट पोलीस स्टेशन,पुणे शहर

## हरविलेल्या मुलीचा तीन तासाच्या आत शोध घेवुन तीला सुखरुप आई वडीलांचे ताब्यात दिले.

आज रोजी् स्वारगेट पोलीस स्टेशन येथे प्रो. पोलीस उप निरीक्षक श्री.जाधव व पोलीस हवालदार विजय पुंडलिक माने नेहरु स्टेडीयम पोलीस चौकी येथे चौकी अंमलदार डयुटीस हजर असताना सकाळी १०.०० वा. चे सुमारास सौ.उज्वला उमेश जाखल, रा.म.न.पा.शाळेमागे, कदम चाळ, कात्रज, पुणे येथुन शिवाजीनगर येथे मामाकडे स्वारगेट मार्गे जात असताना त्यांची मुलगी वय ०९ वर्षे, अंगात नेसणीस निळा व लाल पिवळया रंगाचा गोल गळयाचा टि शर्ट, बॉय कट, हिरव्या रंगाचा लेग ईन, पायात चप्पल असे परिधान करुन हि आज सकाळी १०.०० वा. चे सुमारास स्वारगेट एस.टी.स्टॅन्ड येथुन कोणास काही न सांगता कोठेतरी निघुन गेली आहे बाबत तक्रार देणेस आले. त्यावेळेस प्रो. पोलीस उप निरीक्षक श्री.जाधव व पो.हवा.माने यांनी क्षणाचाही विलंब न करता स्वारगेट एस.टी.स्टॅन्ड येथे जावुन, स्वारगेट एस.टी.स्टॅन्ड येथे डयुटीवर हजर असलेले पोलीस नाईक विजय खोमणे यांना माहिती दिली. त्यावर त्यांनी स्वारगेट एस.टी.स्टॅन्डमधील सी.सी.टी.व्हि. फुटेज पाहीले असता, नमुद वर्णनाची मुलगी कात्रज च्या दिशेला बस स्टॅन्ड मधुन बाहेर गेल्याचे दिसुन आले. तात्काळ प्रो.पोउपनिरी श्री.जाधव यांनी पोलीस नाईक खोमणे व तपास पथकातील पोलीस शिपाई बडे यांना मार्गदर्शन देवुन मुलीचा शोध घेणेकरीता पाठविले असता मुलीच्या वर्णनावरुन माहिती घेत तिचे राहते घरी म.न.पा.शाळेमागे, कदम चाळ, कात्रज येथे गेले. सदर परिसरात मुलीचा शोध घेत असताना पोना खोमणे व पोशि बडे यांना मुलगी नामे कु.ऐश्वर्या ही घराचे जवळील परिसरात मिळुन आली. कु.उज्वला उमेश जाखल हिस पोलीस स्टेशन येथे आणुन तिच्या आई वडीलांचे ताब्यात सुखरुप देण्यात आले. सदर बाबत मा.शब्बीर सय्यद पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली प्रो.पोलीस उप निरीक्षक श्री.जाधव, पो.ना. खोमणे, पो.शि.बडे व पो.हवा.माने यांनी मोलाची कामगिरी बजावुन हरविलेल्या मुलीचा तीन तासाच्या आत शोध घेवुन मुलीचे वडील श्री उमेश कृष्णा जाखल, रा.म.न.पा.शाळेमागे, कदम चाळ, कात्रज, पुणे आई सौ उज्वला जाखल हयांचे ताब्यात सुखरुप दिली. त्याबाबत त्यांनी पोलीसांचे आभार मानले.

